








५. येरवडा गावठाणातील सामाजिक कार्यकर्ते लक्ष्मण काशीदकर यांना मानपत्र देताना दीपक सावंत ६. दीपक सावंत यांच्याकडून मानपत्र स्वीकारताना मुक्तांगण व्यसनमुक्ती केंद्राचे समुपदेशक दत्ता श्रीखंडे ७. दीपक सावंत यांच्याकडून मानपत्र स्वीकारताना माजी कलाशिक्षक सुदाम विश्ववे ८. दीपक सावंत यांच्याकडून मानपत्र स्वीकारताना पौर्णिमा गादिया

# दैनिक महा मेट्रो चा चौथा वर्धापन दिन मोठ्या उत्साहात संपन्न

पान १ वरून..

ज्योती विल्सन चंदेवळ, मुक्तांगण व्यसनमुक्ती केंद्राचे समुपदेशक दत्ता श्रीखंडे, व्यंगचित्रकार मंदार नाईक, लेखक व दिग्दर्शक शहानवाज शेख, शिक्षिका वैशाली खांदवे, क्रिडाशिक्षक संजय गायकवाड, पत्रकार, छायाचित्रकार श्रीकांत वाघ , गणेश घायमुक्ते, अनिल ड्रायव्हिंग स्कुलचे मालक अनिल आडागळे, विधी संघर्षीत पालकांमध्ये उल्लेखनीय कार्य केलेले जी.एन. पडघम आदींचा मानपत्र देऊन सन्मान करण्यात आला. या कार्यक्रमात विविध मान्यवरांनी दैनिक महा मेट्रोच्या कार्याची प्रशंसा करत, समाजातील सकारात्मक बदल घडविण्यासाठी माध्यमांची भूमिका किती महत्त्वाची आहे यावर भर दिला. सामाजिक, शैक्षणिक, सांस्कृतिक आणि पर्यावरण या विविध क्षेत्रांत कार्य करणाऱ्या व्यक्तींचा सन्मान करून पुढील पिढीसमोर प्रेरणादायी आदर्श ठेवण्याचा प्रयत्न झाल्याचे आयोजकांनी सांगितले. कार्यक्रमाला उपस्थित प्रेक्षकांनीही मोठ्या उत्साहात सहभाग नोंदवून या वर्धापन दिनाला अविस्मरणीय स्वरूप दिले. समारोपाच्या वेळी उपस्थितांनी एकत्र येऊन पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या.

# महावितरणकडून विद्युत सहायकांची परिमंडलनिहाय निवड यादी जाहीर, कागदपत्रांची पडताळणी २० ते २२ ऑगस्टला

**मुंबई । प्रतिनिधी**

महावितरणमध्ये विद्युत सहायक पदासाठी निवड झालेल्या ५ हजार ३८१ उमेदवारांची व संबंधित परिमंडलांची यादी कंपनीच्या अधिकृत संकेतस्थळावर जाहीर करण्यात आली आहे. या सर्व उमेदवारांच्या मूळ कागदपत्रांची व प्रमाणपत्रांची पडताळणी संबंधित परिमंडल कार्यालयांमध्ये दि. २० ते २२ ऑगस्ट दरम्यान करण्यात येणार आहे. या उमेदवारांनी त्यांच्या नावासमोर नमूद परिमंडल कार्यालयांमध्ये मूळ कागदपत्रे/ प्रमाणपत्रे तसेच अद्ययावत ओळखपत्राच्या मूळ प्रतीसह स्वतः हजर राहणे अनिवार्य आहे.

महावितरणने जाहिरात क्र. ०६/२०२३ अन्वये विद्युत सहायक या पदासाठी दि. २० ते २२ मे दरम्यान ऑनलाइन क्षमता चाचणी घेतली होती. यात निवड झालेल्या उमेदवारांची यादी दि. ३० जुलैला सविस्तर माहिती व सूचनेसह कंपनीच्या संकेतस्थळावर प्रसिद्ध करण्यात आली आहे. त्यानंतर दि. १४ ऑगस्टला निवड यादीतील उमेदवार व त्यांना वर्ग केलेल्या परिमंडलांची यादी जाहीर करण्यात आली आहे.

आता येत्या दि. २० ते २२ ऑगस्ट दरम्यान विद्युत सहायक पदासाठी निवड झालेल्या उमेदवारांच्या ऑनलाइन अर्जा मधील नोंदी, अर्हता, कागदपत्रे व प्रमाणपत्रांची छाननी व पडताळणी त्यांना वर्ग केलेल्या संबंधित परिमंडल कार्यालयांमध्ये होणार आहे.

या तीनही दिवशी संबंधित परिमंडलांमध्ये सकाळी १० वाजता मूळ कागदपत्रांची पडताळणी सुरू होईल. नमूद दिवशी काही कारणास्तव पडताळणी पूर्ण झाली नाहीतर दुसऱ्या दिवशी करण्यात येईल. तथापि, सर्व मूळ कागदपत्रे व प्रमाणपत्रांसह संबंधित उमेदवारांनी स्वतः हजर राहणे आवश्यक आहे. जे उमेदवार कागदपत्रे पडताळणीसाठी हजर राहणार नाही त्यांची निवड रद्द समजली जाईल व भविष्यात त्यांच्या कोणताही पत्रव्यवहार केला जाणार नाही असे महावितरणकडून स्पष्ट करण्यात आले आहे.

विद्युत सहायक पदी निवड झालेल्या उमेदवारांची मूळ कागदपत्रे व प्रमाणपत्रांची पडताळणी केल्यानंतर जे उमेदवार पात्र होतील त्यांच्या नियुक्तीबाबत संबंधित परिमंडला मध्ये पुढील कार्यवाही करण्यात येईल. याबाबतची सर्व माहिती महावितरणच्या www.mahadiscom.in या संकेतस्थळावर उपलब्ध आहे.

# ड्रोनचा वापर करुन हातभट्टी दारू तयार करणाऱ्या अड्ड्यांवर कारवाई

**पुणे । वार्ताहर**

पोलीस आयुक्त परिमंडळ ४, पुणे शहर हद्दीतील अवैध धंद्यावर प्रभावी कारवाई करण्यासाठी विशेष मोहीम राबवून अवैधपणे सुरु असणाऱ्या धंद्यावर कठोर कारवाई करुन समूळ उच्चाटन करण्याचे आदेश पोलीस उप-आयुक्त, परिमंडळ ४ सोमय मुंडे यांनी दिले आहेत.

शनिवार रोजी पहाटे पासुन मासरेडचे आयोजन करून पोलीस उप-आयुक्त परिमंडळ ४ हद्दीमध्ये लपून-छपून हातभट्टी तयार करणाऱ्या ठिकाणावर वरिष्ठांचे मार्गदर्शनात कारवाई करत हातभट्टी दारू तयार करणारे, देशी-विदेशी दारूची अवैध विक्री व्यवसाय करणाऱ्या एकुण १६ लोकांवर कारवाई करुन १६ गुन्हे दाखल करून ३६,७३५/- रु. किं.चा मुद्देमाल जप्त करण्यात आला. त्यामध्ये ३१,६३०/- रु. कि.ची ३१८ लि. गावठी हातभट्टी तयार दारु व २.९६०/- रु. किं.ची ६.६०० लिटर देशी दारु जप्त करण्यात आली आहे.

अवैध धंद्यावर कारवाई करण्यासाठी २३ पोलीस अधिकारी, ६८ पोलीस अमलदारांची व ०१ एम.एस.व्ही. व्हॅन व ड्रोनचा वापर करुन वरील विशेष पथकाद्वारे सदरची मोहीम राबविण्यात आली.

# ज्ञानोबा-तुकाराम जयघोषात दुमदुमला टाळगाव-चिखली परिसर महापालिकेच्या शाळेत रंगला भक्ती, एकात्मता आणि परंपरेचा अद्भुत संगम

**पिंपरी । वार्ताहर**

संतश्रेष्ठ श्री ज्ञानेश्वर महाराज यांच्या सप्तशतकोत्तर सुवर्णमहोत्सवी (७५० वी) जयंती वर्षानिमित्त पिंपरी चिंचवड महापालिकेच्या जगद्गुरु संत तुकाराम महाराज संतपीठ शाळेत भक्तिमय वातावरणात भव्य पालखी मिरवणूक सोहळा संपन्न झाला. पिंपरी चिंचवड महापालिकेच्या वतीने टाळगाव-चिखली परिसरातील जगद्गुरु संत तुकाराम महाराज संतपीठ शाळा व महाविद्यालय परिसरातून ज्ञानेश्वर महाराजांच्या मूर्तीची पालखीतून भव्य मिरवणूक काढण्यात आली. या मिरवणुकीत टाळ-मृदुंगाच्या गजरासह टाळ-चिपळ्यांचा नाद आणि विद्यार्थ्यांच्या अभंगांनी संपूर्ण परिसर भक्तिमय झाला. 'ज्ञानोबा माऊली' आणि 'ज्ञानबा-तुकाराम'च्या जयघोषाने वातावरण दुमदुमून गेले. शाळेतील विद्यार्थ्यांनी वारकरी वेशभूषेत सहभाग घेतला होता. महिला बचत गटांच्या सदस्यांनी, स्थानिक समाजसेवकांनी, वारकरी बांधवांनी तसेच परिसरातील नागरिकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहून पालखी सोहळ्याची शोभा वाढवली. वारकरी परंपरेतील पालखी सोहळा जसा श्रद्धा आणि भक्तीचे प्रतीक आहे, तसाच तो एकात्मता आणि सामाजिक बंध दृढ करणारा सोहळा ठरला. पालखी सोहळ्याचे आयोजन पिंपरी चिंचवड महानगरपालिकेचे आयुक्त तथा प्रशासक शेखर सिंह, अतिरिक्त आयुक्त प्रदीप जांभळे पाटील, समाज विकास विभाग उपायुक्त ममता शिंदे, शिक्षण विभागाचे सहाय्यक आयुक्त किरण कुमार मोरे, प्रशासन अधिकारी संगीता बांगर आणि जगद्गुरु संत तुकाराम महाराज संतपिठाचे संचालक ह. भ. प. राजू महाराज ढोरे ,डॉ. स्वाती मुळे आणि शाळेचे मुख्याध्यापक ज्ञानेश्वर गाडगे यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आले होते. त्यांच्या नियोजनामुळे आणि समन्वयामुळे संपूर्ण मिरवणूक सोहळा शिस्तबद्ध आणि यशस्वीरीत्या पार पडला.











# १० मीटर एअर रायफल स्पर्धेत हरियाणाच्या दीपक सैनीला सुवर्ण पदक

**पुणे । वार्ताहर**

श्री शिवछत्रपती क्रीडा संकुल, म्हाळुंगे येथे सुरू असलेल्या एजीसी स्पोर्टस पॅरा एडिशन २०२५ मध्ये रविवारी झालेल्या पुरुषांच्या १० मीटर एअर रायफल स्टँडिंग (डक१) स्पर्धेत हरियाणाच्या दीपक सैनीने सुवर्ण पदकाची कमाई केली. तसेच या स्पर्धेत कर्नाटकाच्या राकेश एन. निदागुंडी याने रौप्य पदक तर कर्नाटकाच्याच सचिन सिद्दन्नावर याने कांस्य पदक पटकावले. विशेष म्हणजे शेवटच्या फेरीपर्यंत अंतिम सामना चुरशीचा रंगला होता. यात हरियाणाच्या दीपक सैनीने अफलातून नेमबाजी करत सुवर्ण पदक आपल्या नावावर केले.

११ ऑगस्टपासून सुरू झालेली एजीसी स्पोर्टस पॅरा एडिशन २०२५ ही स्पर्धा पॅराथलिट्सना आपली गुणवत्ता सिद्ध करण्यासाठी मोठे व्यासपीठ ठरत आहे. विविध राज्यांतील पॅरा खेळाडू यात सहभागी झाले असून, त्यांच्या खेळातील जिद्दीमुळे स्पर्धेला वेगळाच रंग आला आहे.

या स्पर्धेचा समारोप उद्या, १८ ऑगस्ट रोजी होणार असून विजेत्या स्पर्धकांना बक्षिसांचे वितरण करण्यात येणार आहे. त्यामुळे अंतिम सामने पाहण्यासाठी जास्तीत जास्त पुणेकरांनी उपस्थित राहावे, असे आवाहन आयोजकांकडून करण्यात आले आहे.

# करिअरच्या संधी शोधताना विद्यार्थ्यांनी नवीन गोष्टी शिकण्याला प्राधान्य द्यावे - कैलाश काटकर, व्यवस्थापकीय संचालक, क्विकहिल टेक्नॉलॉजीज 'यशोगाथा' विशेषांकाचा प्रकाशन सोहळा संपन्न

**पुणे । प्रतिनिधी**

करिअरच्या संधींचे पर्याय शोधताना विद्यार्थ्यांनी केवळ कोणत्या कंपनीत आपल्याला नोकरीची संधी हवी आणि अमुक तमुक मोठे आर्थिक पॅकेज देणाऱ्या पर्यायांना प्राधान्य देण्याऐवजी ज्या कंपन्यांमध्ये आपल्याला नवनवीन गोष्टी,अद्ययावत तंत्रज्ञान शिकण्याची संधी उपलब्ध होऊ शकते, अशा ठिकाणी नोकरीच्या संधी शोधायला हव्यात असे मत क्विक हिल टेक्नॉलॉजीजचे व्यवस्थापकीय संचालक कैलाश काटकर यांनी व्यक्त केले.

यशस्वी एज्युकेशन सोसायटीच्या इंटरनॅशनल इन्स्टिट्यूट ऑफ मॅनेजमेंट सायन्स (आयआयएमएस) येथे स्वातंत्र्यदिनानिमित्त आयोजित ध्वजारोहण सोहळ्यानंतर विद्यार्थ्यांशी संवाद साधताना बोलत होते. यावेळी बोलताना त्यांनी त्यांच्या उद्योजकीय प्रवासाची वाटचाल कशी होत गेली हे सांगत आपण सातत्याने नवनवीन गोष्टी शिकण्याची आस मनात बाळगून त्यादृष्टीने प्रयत्नशील व्हायला हवे हे सांगितले. स्क्रीन प्रिंटिंग, रेडिओ दुरुस्ती,कॅल्क्युलेटर दुरुस्ती सारख्या कामांपासून सुरुवात करून अँटीव्हायरस सोल्यूशन्स विकसित करण्यापर्यंतचा आणि पुढे क्विक हिल टेक्नॉलॉजीज या स्वतःच्या कंपनीची सुरुवात करण्यापर्यंतचा प्रवास त्यांनी उलगडून दाखवला. आपणा सर्वांना आयुष्यात विविध प्रकारची माणसे भेटतात,मात्र भेटणाऱ्या प्रत्येकातून केवळ त्यांच्यातील चांगल्या गुणांना शोधून तो अंगीकारण्याची आईने दिलेली शिकवण मला खूप उपयोगी ठरली असेही काटकर यांनी सांगितले.

यावेळी त्यांच्या हस्ते 'यशोगाथा' विशेषांकाचे प्रकाशन करण्यात आले. तसेच टी शर्ट पेंटिंग स्पर्धेतील विजेत्या विद्यार्थिनींना त्यांच्या हस्ते पारितोषिके प्रदान करण्यात आली. घरातल्या आर्थिक दुर्बलतेमुळे शालेय शिक्षण अर्धवट सोडून करिअरला सुरुवात करून ते आज हजारो कोटींचे मूल्य असणारी जगभरातील करोडो कॉम्प्युटर, मोबाईल आणि इतर इलेक्ट्रॉनिक गॅझेट्सचे व्हायरसपासून संरक्षण करणारी क्विक हिल टेक्नॉलॉजीज कंपनी सुरु करण्यापर्यंतचा कैलाश काटकर यांचा प्रवास ऐकून उपस्थित विद्यार्थ्यांना प्रेरणादायी मार्गदर्शन मिळाले.

या कार्यक्रमाला 'यशस्वी' संस्थेचे संचालक राजेश नागरे, मनुष्यबळ व्यवस्थापक श्रीकांत मिरजकर, मार्केटिंग विभाग प्रमुख प्रशांत कुलकर्णी, आयआयएमएसच्या एमबीए विभाग प्रमुख डॉ. वंदना मोहंती, एमसीए विभाग प्रमुख डॉ. अश्विनी ब्रम्हे यांच्यासह सर्व प्राध्यापक वर्ग व विद्यार्थी- विद्यार्थिनी उपस्थित होते.या कार्य्रक्रमासाठी पवन शर्मा, स्वप्नील देशमुख आदींनी विशेष सहकार्य केले. अधिक माहितीसाठी संपर्क योगेश रांगणेकर : मो : ७३५००१४५३६ / ९३२५५०९८७०








१) यशस्वी एज्युकेशन सोसायटीच्या इंटरनॅशनल इन्स्टिट्यूट ऑफ मॅनेजमेंट सायन्स (आयआयएमएस) येथे स्वातंत्र्यदिन सोहळ्यावेळी उपस्थित प्रमुख अतिथी क्विक हिल टेक्नॉलॉजीजचे व्यवस्थापकीय संचालक कैलाश काटकर, यावेळी त्यांच्यासमवेत डावीकडून 'यशस्वी' संस्थेचे मार्केटिंग विभाग प्रमुख प्रशांत कुलकर्णी, यशस्वी संस्थेचे संचालक राजेश नागरे, ग्रंथपाल पवन शर्मा व यशस्वी संस्थेचे मनुष्यबळ व्यवस्थापक श्रीकांत मिरजकर. २) यशस्वी एज्युकेशन सोसायटीच्या इंटरनॅशनल इन्स्टिट्यूट ऑफ मॅनेजमेंट सायन्स (आयआयएमएस) येथे स्वातंत्र्यदिन सोहळ्यावेळी 'यशोगाथा' विशेषांकाचे प्रकाशन करताना प्रमुख अतिथी क्विक हिल टेक्नॉलॉजीजचे व्यवस्थापकीय संचालक कैलाश काटकर, यावेळी त्यांच्यासमवेत डावीकडून 'यशस्वी' संस्थेचे मार्केटिंग विभाग प्रमुख प्रशांत कुलकर्णी, यशस्वी संस्थेचे संचालक राजेश नागरे, ग्रंथपाल पवन शर्मा व यशस्वीचे मनुष्यबळ व्यवस्थापक श्रीकांत मिरजकर. ३) यशस्वी एज्युकेशन सोसायटीच्या इंटरनॅशनल इन्स्टिट्यूट ऑफ मॅनेजमेंट सायन्स (आयआयएमएस) येथे स्वातंत्र्यदिन सोहळ्यानिमित्त विद्यार्थ्यांशी संवाद साधताना प्रमुख अतिथी क्विक हिल टेक्नॉलॉजीजचे व्यवस्थापकीय संचालक कैलाश काटकर. ४)यशस्वी एज्युकेशन सोसायटीच्या इंटरनॅशनल इन्स्टिट्यूट ऑफ मॅनेजमेंट सायन्स(आयआयएमएस) येथे स्वातंत्र्यदिन सोहळ्यानिमित्त विद्यार्थ्यांशी संवाद साधताना प्रमुख अतिथी क्विक हिल टेक्नॉलॉजीजचे व्यवस्थापकीय संचालक कैलाश काटकर. ५) यशस्वी एज्युकेशन सोसायटीच्या इंटरनॅशनल इन्स्टिट्यूट ऑफ मॅनेजमेंट सायन्स (आयआयएमएस) येथे स्वातंत्र्यदिन सोहळ्यानिमित्त टी- शर्ट पेंटिंग स्पर्धेतील विजेत्या विद्यार्थिनी सिद्धी केसरवानी, रितू देशमुख, कोमल गौड व तेजस्विनी खरे यांच्यासमवेत कार्यक्रमाचे प्रमुख अतिथी क्विक हिल टेक्नॉलॉजीजचे व्यवस्थापकीय संचालक कैलाश काटकर. यावेळी डावीकडून 'यशस्वी'संस्थेचे मार्केटिंग विभाग प्रमुख प्रशांत कुलकर्णी, यशस्वी संस्थेचेसंचालक राजेश नागरे, ग्रंथपाल पवन शर्मा व यशस्वीचे मनुष्यबळ व्यवस्थापक श्रीकांत मिरजकर.